Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

UGC Approved Monthly Journal

VOL-IV | ISSUE-XII | Dec. | 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# ना. गोपाळ कृष्ण गोखले यांचा उदारमतवादी राजकीय विचार प्रवाह

**प्रा. प्रशांत देशपांडे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
एच.पी.टी. आर्टस् ॲण्ड
आर.वाय.के. सायन्स कॉलेज, नाशिक

नेमस्तांचे अग्रणी, न्या. रानडे यांचे शिष्य व म. गांधी यांचे राजकीय गुरु ना. गोपाळ कृष्ण गोखले यांचा उदारतमतवादी राजकीय विचारांचा अभ्यास करताना प्रथमतः भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनातील पुढील तीन टप्प्यांचा विचार करावा लागतो.

स्थूलमानाने कॉंग्रेसच्या स्थापनेपासून वंगभंगापर्यंतचा काळ हा उदारमतवादाचा काळ (१८८७ ते १९०५) मानला जाई. त्यानंतर गांधी युगाच्या प्रारंभीच्या काळाला (१९०५ ते १९१९) राष्ट्रवादी विचारसरणीचा काळ म्हणता येईल. आणि गांधीयुगाच्या प्रारंभापासून स्वातंत्र्यप्राप्तीचा काळ हा समन्वयाचा काळ (१९१९ ते १९४७) मानावा लागेल.

ना. गोपाळ कृष्ण गोखले यांनी वीस वर्षे डेक्कन एज्युकेशन संस्थेची सेवा करण्याची शपथ पूर्ण करून खऱ्या अर्थाने १९०२ साली देशसेवेच्या विशाल क्षेत्रात पदार्पण करण्याचा संकल्प सोडला.

ना. गोखले यांनी १९०२ ते १९१७ या १३ वर्षाच्या काळात प्रामुख्याने देशसेवेच्या विशाल क्षेत्रात कार्य करताना न्या. महादेव गोविंद रानडे यांचाच उदारमतवादी विचार पुढे नेला, असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही.

न्या. रानडे यांच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा (उदारमतवादी) उगम पाश्चात्य उदारमतवादी विचारप्रणालीमध्ये होत असल्याकारणाने बुद्धीप्रामण्यवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, परमतसहिष्णूता, सामाजिक कर्तव्य बुद्धी, विवेकप्रधान कार्याचे सर्वश्रेष्ठत्व, सनदशीर शासन आणि विवेकनिष्ठ जीवनदृष्टी या पाश्चात्य उदारमतवादी वैशिष्ट्यांचा रानड्यांच्या राजकीय उदारमतवादी तत्त्वज्ञांमध्ये समावेश झाल्याचे दिसते.

मात्र ना. गोपाळ कृष्ण गोखले यांचा उदारमतवादी विचार हा पश्चिमी उदारमतवादाचे अंधानुकरण करणारा नव्हता तर तो तत्कालीन भारतीय वस्तुस्थितीला धरून मूळ पाश्चिमात्य उदारमतवादी तत्त्वज्ञानाला मुरड घालून उदयास आलेला 'परिष्कृत उदारमतवाद' होता.

प्रचलित अर्थाने गोखले हे राजकीय विचारवंत वा तत्त्वज्ञ नव्हते. कारण त्यांच्या वाट्याला 'हस्तिदंती मनोऱ्यातील' निवांतपणा आला नव्हता; तर केवळ सेवा, निष्ठा व त्यागाने भरलेले सार्वजनिक जीवन त्यांच्या वाट्याला आल्याकारणामुळे त्यांनी राज्य व समाजाविषयी तात्विक चर्चा केली नाही, की एखाद्या विचारसरणीला धरून 'सिद्धांत' वा वाद (ईझम्स) उभे केले नाहीत, की राजकीय विचाराच्या क्षेत्रात त्यांनी एखाद्या प्रबंधाची वा ग्रंथाची भर घातली नाही. त्यांच्या लेखनाचा बराच मोठा भाग देशाच्या तात्कालिक गरजांच्या संदर्भात व सार्वजनिक जीवनाच्या मागण्यांच्या संदर्भात तसेच शासनाच्या धोरणांवर प्रभाव टाकण्याच्या व लोकांना शिक्षण देण्याच्या प्रयत्नात विविध प्रश्नांवर व मुद्यांवर मांडलेल्या संकीर्ण विचारांच्याच स्वरूपात आहे. यातूनच गोखल्यांच्या राजकीय उदारमतवादी विचारांची सूत्रबद्ध मांडणी करण्याचा प्रयत्न या शोध लेखनात केला आहे.

गोखले यांचे राजकीय विचार हे कोणत्याही प्रस्थापित राजकीय सिद्धांताला आहारी जाऊन व्यक्त झाले नाहीत, तर शक्यता+औचित्य+प्राप्यता या तीन निकषांवर घासून व स्वतःच्या चिंतनाच्या मंथनात घुसळून मांडले गेले आहेत.

गोखले यांनी केलेल्या विविध प्रसंगाच्या भाषण व लेखनातून त्यांचा उदारमतवादी विचार डोकावतो. केवळ भावनांना आवाहन न करता श्रोत्यांच्या व वाचकांच्या बुद्धीला व सद्सद्विवेकाला त्यांनी आवाहन केल्याचे दिसून येते. केवळ चमकदार शब्दरचना व कल्पनेच्या भराऱ्या आढळत नाहीत, तर सखोल विचारांचा अत्यंत मुद्देसूद ऊहापोह त्यांच्या ठायी–ठायी आढळतो. विरोधक व प्रतिपक्षी याबद्दल संकुचित मत्सर वा अनुदारवृत्ती त्यातून उमटत नाही तर सर्वत्र त्यांच्या मताबद्दल सहिष्णुता व आदर बाळगताना ते आढळतात.

गोखले यांच्या राजकीय विचाराच्या मूलसूत्रात प्रामुख्याने ऐहिक प्रगतीची संकल्पना, मानवाच्या सामूहिक प्रयत्नातून सामाजिक स्थिती बदलता येणे शक्य असल्याबद्दलचा विश्वास, मानवाच्या अंगभूत प्रतिष्ठेला मान्यता, त्यांच्या अंगी वसत असलेल्या ज्ञान व शक्ती या गुणांची जाणीव इत्यादी खास गुणांचा समावेश होता.

गोखल्यांच्या राजकीय विचारांचा अभ्यास करताना प्रामुख्याने गोखल्यांचे (१) ब्रिटिश सनदीसेवेसंबंधीच विचार, (२) शासन विषयक विचार, (३) राजकीय साध्य व साधनासंबंधीचे विचार, (४) धर्मनिरपेक्ष आधुनिक राज्याची संकल्पना व (५) भारतीय मध्यमवर्गाबद्दलची भूमिका समजावून घेणे आवश्यक ठरते.

**ब्रिटिश सनदी सेवेसंबंधी विचार :**

भारतीय ब्रिटिश सनदी सेवेचे नोकरशाहीत रूपांतर झाल्याकारणामुळे सत्तेचे केंद्रीकरण व लोकमताचा अनादर हे दोन दोष ब्रिटिश नोकरशाहीत निर्माण झाल्याने भारतीय तरुणांच्या मनात ब्रिटिश शासनाबद्दल कमालीचा परात्मभाव (एलीनेशन) वाढीस लागला आहे. यातून मार्ग काढण्यासाठी गोखलेंनी वेळोवेळी सनदीसेवेत उच्चपदावर भारतीयांना सहभागी करून व सनदी सेवेच्या परीक्षा भारतात घेण्यात येऊन परात्मभाव नाहीसा करण्यासाठी प्रयत्न केले. हे प्रयत्न दोन पातळीवर केले असल्याचे स्पष्ट होते. एक म्हणजे विविध कमिशन पुढील साक्षीमध्ये व पार्लमेंटच्या सभेपुढे.

**शासन विषयक विचार**

शासन हे मानवाकरिता असून मानवाला आपल्या इच्छेप्रमाणे व गरजेप्रमाणे ते बदलण्याचा पूर्ण अधिकार आहे. शासनाच्या मर्यादा व्यक्तीच्या इच्छेनुसार ठराव्यात, शासन हे कोणत्याही विशिष्ट वर्गासाठी नसून संपूर्ण समाजासाठी आहे व त्यामुळे भिन्न वर्गातील परस्पर विरूद्ध हितसंबंधांमधील अंत:विरोध नि:पक्षपातीपणे मिटवणे, ही शासनाची जबाबदारी आहे. शासितांच्या धार्मिक क्षेत्रात शासनाने अतिरिक्त हस्तक्षेप करू नये, सर्व व्यक्ती राजकीयदृष्ट्या समान आहेत. – ना. गोखले.

ब्रिटीश सत्तेबाबत गोखल्यांची भावना रानड्यांप्रमाणेच कृतज्ञतेची होती. ब्रिटीश सत्तेपासून कायमची फारकत गोखल्यांना कल्पनेतही मान्य नव्हती. साम्राज्यांतर्गत स्वायतत्ता एवढेच त्यांचे राजकीय उद्दीष्ट्य परिमित होते.

गोखले यांच्यामते शासन हे स्वयंमेव साध्य नसून ते केवळ एक साधन आहे. लोकांच्या जीवनाचे सर्वांगीण परिवर्तन करणे हे त्यांचे साध्य आहे. परिणामी समाजाच्या आधुनिकीकरणाचे महान साधन म्हणून गोखले शासन संस्थेकडे पहातात.

गोखले यांच्यामते ब्रिटीश शासनाचे या देशातील विशिष्ट स्थान लक्षात घेता त्या शासनाचे सतत प्रागतिक असणे अत्यंत आवश्यक आहे. कारण या शासनाला हिंदी मनाची नव्याने अशी घडण करायची आहे, की जी प्रगतीला पोषक ठरेल. या भूमिकेतून गोखल्यांनी प्रागतिक शासनाचे चार निकष सांगितले आहेत.

१) जनतेची नैतिक व भौतिक सुधारणा करणे. २) स्थानिक स्वराज्याच्या कारभारात जनतेला अधिकाधिक सहभागी करून घेणे, ३) कौन्सिलमधील चर्चेत लोकमताच्या आवाजाला वाव मिळणे, ४) सार्वजनिक सेवांमध्ये जास्तीत जास्त भारतीयांना प्रवेश देणे.

सारांशरूपाने गोखलेंचे शासन संबंधीचे उपरोक्त विचार हे पाश्चिमात्य उदारमतवादाच्या चौकटीत बसणारे नाहीत. कारण इंग्लंड हे पूर्ण विकसित राष्ट्र असून भारत हा देश अर्धविकसित असल्याकारणाने शासनाने तटस्थतेचे

धोरण सोडून ''शासनाने समाजाच्या प्रगतिशील परिवर्तनात महत्त्वाची भूमिका पार पाडावी व राष्ट्राची अर्थव्यवस्था भरभक्कम उभी करावी.'' – ना. गोखले.

हा देश अर्धविकसित आहे हीच एक गोष्ट या देशातील शासनावर विशेष जबाबदारी टाकण्यास कारणीभूत ठरते. शेती, शिक्षण, उद्योग–धंदे, पाणी पुरवठा, आरोग्य या सगळ्या क्षेत्रात शासनाच्या उपक्रमाखेरीज या देशात काहीही होणे शक्य नाही. विशेषकरून शिक्षण व उद्योगधंद्याच्या क्षेत्रात शासनाने भरीव कामगिरी करावी, असे गोखले म्हणतात.

शासनाने वरील सर्व गोष्टी भारतीयांसाठी कराव्यात असे जरी गोखले सूचवित असले तरी केवळ शासनावरच त्या कार्यासाठी स्वदेशवासीयांनी अवलंबून रहावे, हे त्यांना मुळीच मान्य नव्हते. १/१० कार्य शासन करील व ९/१० कार्य मात्र जनतेनेच करावयाचे आहे – ना. गोखले.

**राजकीय साध्य व साधनासंबंधीचे विचार**

''गोखल्यांना स्वदेश व स्वदेश बांधव याबद्दल अभिमान होता. भारतीय लोक परसत्तेखाली आहेत याचा अर्थ ते असंस्कृत वा अर्धसंस्कृत होते असा नाही. युरोपीयनांच्या पूर्वजांना सभ्यता म्हणजे काय हे सुद्धा ठाऊक नव्हते तेव्हा या देशात उच्च दर्जाची एक सभ्यता नांदत होती. धर्म, वाङ्मय व तत्त्वज्ञान तसेच कला आणि विज्ञान या सर्वच क्षेत्रात हिन्दुस्थानातील प्राचीन विद्वानांनी मोलाची कामगिरी केली आहे. ''आज परकीय राजवटीखाली हे राष्ट्र आहे. म्हणजे त्याचे पौरूषच नष्ट झाले आहे असे नाही. या देशवासीयांनी आपले स्वातंत्र्य गमावले असले तरी सुसंस्कृत लोक म्हणून जो सन्मान मिळवला तो त्यांनी गमावलेला नाही'' या शब्दात गोखले यांनी इंग्लंडच्या श्रोतवृंदांसमोर उपरोक्त विचार मांडले आहेत.

केवळ काल्पनिक आदर्शात रमण्याची गोखल्यांची वृत्ती नसल्याकारणे व त्यांच्या राजकीय महत्त्वकांक्षा फक्त वर्तमानकाळ व निकटचा भविष्यकाळ ऐवढ्यापुरताच मर्यादित असल्याकरणाने क्रमाक्रमाने घडत जाणाऱ्या घडामोडींपैकी जी लगतची असेल तिच्यावर संपूर्ण लक्ष केंद्रित करण्याचे त्यांचे धोरण असल्याकारणाने ना. गोखले यांनी या देशाला पूर्ण स्वराज्य मिळावे अशी मागणी न करता (केवळ ही मागणी जहालांनी केली होती) स्वयंशासनाची (सेल्फ गव्हर्नमेंट) मर्यादित स्वरूपातील राजकीय मागणी ब्रिटीशांकडे गोखले यांनी केली होती.

याचे प्रमुख कारण इंग्रजी राजवटीत या देशाच्या आधुनिकीकरणासाठी लागणारी प्रत्येक गोष्ट घडू शकते. त्या सत्तेला झुगारण्याची गरज नाही व झुगारणे इष्टही होणार नाही. हा अदम्य आशावाद ब्रिटीश राजवटीसंबंधी गोखल्यांच्या मनात असल्याकारणाने गोखल्यांनी एकाचवेळी स्वदेशाभिमान बाळगून ब्रिटीश राजटीतील दोषांवर बोट ठेवून त्यांनी भारताच्या मर्यादित ''स्वयंशासनाची'' राजकीय मागणी १९०४ च्या दरम्यान ''हिन्दसेवक समाजाच्या'' उद्देशपत्रिकेत अंतर्भूत करून टाकली.

गोखल्यांच्या मते पूर्ण स्वराज्यापेक्षा 'वासाहतिक स्वयंशासनाच्या ध्येयाद्वारे काही विशेष फायदे या देशाला होऊ शकतात. यातील एक प्रमुख फायदा म्हणजे हे ध्येय स्विकारले असता विचारांना कमीत कमी धक्के देऊन लढा चालविला जाऊ शकतो. तसेच परिचित वाटांनी केलेली ती वाटचाल ठरते व इंग्लंडमध्ये या पाश्यात्य देशातील घटनात्मक परंपरेस जे जे सन्माननीय आहे ते ते आपोआपच या साध्यान्वये भारतीयांच्या पदरात पडणारे आहे.

गोखल्यांच्या मते प्रसंगी इंग्रज राज्यकर्त्यांनी चुका केल्या असतील. त्यापैकी कित्येक शोचनीयही असतील तरी पण एक सत्य उरतेच आणि ते म्हणजे ब्रिटिश लोकांचा मूळपिंड राजकीय स्वातंत्र्याचा व घटनात्मक स्वातंत्र्याचा आहे. तेव्हा या लढ्यात वरील भरगच्च फायदे तुडवून आततायी वर्तन भारतीयांनी करणे भारतीयांनाच अपायकारक ठरले. या भूमिकेतून जहालांची पूर्ण स्वातंत्र्याची मागणी गोखल्यांनी व्यर्थ ठरविली होती.

**साधने**

स्वयंशासनातून भारताला स्वराज्याची प्राप्ती करावयाची असेल तर अशीच साधने वापरणे गोखल्यांना मान्य होती की, ''ज्या साधनांच्या वापरातून ब्रिटिश राज्यकर्ते दुरावणार नाहीत'' या भूमिकेतून गोखल्यांनी राज्यकर्त्यांना आवाहन करणे, त्यांच्याकडे तक्रारी, गाऱ्हाणी, अपेक्षा, प्रसंगी निषेधही पाठविणे व राज्यकर्त्यांचे मन आपल्याला अनुकूल करून घेणे असा सोयीचा व सनदशीर मार्ग गोखल्यांनी स्वीकारला होता.

गोखल्यांच्या मते ब्रिटिश राजवट किती जरी क्रूर, पाशवी व जनहिताबाबत उदासीन आढळली तरी देखील तिच्यात अनेक असे अधिकारी आहेत की, जे व्यक्तिशः अत्यंत उदारमतवादी व जनहिताबद्दल कळकळ बाळगणारे आहेत. त्यांच्यावर वरील मार्गाचा परिणाम झाल्यावाचून राहणार नाही. तर्कसंगती व युक्तिवादाच्या आधारे अशा अधिकारपदस्थांची मने वळविता आली तरी सुरूवातीला ते खूप मोठे यश ठरते – गोखले.

राजकीय चर्चा म्हणजे नुसता वितंडवाद नसतो. विचारांची देवाण–घेवाण हे अशा चर्चेचे व्यवच्छेदक लक्षण असते. राजकीय चर्चेमधून लोकमत तयार होते आणि या लोकमताचा पाठिंबा ज्या मागणीला असेल ती नाकारणे कितीही प्रबळ राज्यकर्त्यांना शक्य नसते.

याचा अर्थ राज्यकर्त्यांना प्रतिकार करू नये असा मात्र नव्हे. प्रसंगी सडेतोड बोलणे हे व्यक्तीचे कर्तव्य असून जुलमी व अन्याय कायद्यांना प्रतिकार करणे नैतिकदृष्ट्या समर्थनीय आहे. गोखले मात्र अशा कायद्याचे पालन करण्याचे नाकारून त्यासाठी असेल ती शिक्षा पत्करावी असे म्हणतात. या भूमिकेतून गोखलेंनी जहालांच्या मार्गाला विरोध केला.

गोखल्यांच्या मते सार्वजनिक जीवनातील हिंसेचा वापर हा सार्वजनिक जीवनात परस्पर द्वेष, सुडाची भावना व विपत्तीचीच निर्मिती करतो. परिणामी सार्वजनिक जीवन दुषित होऊ नये म्हणून गोखले यांनी शांततापूर्वक व क्रमश: बदल घडवून आणणारा सनदशीर मार्गाच भारतीय स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी श्रेयस्कर मानला.

गोखल्यांच्यामते राजकीय चळवळ हे राजकीय शिक्षणाचे एक साधन असून घटनात्मक चळवळीचा हाच सर्वात मोठा निकष असल्याकारणाने केवळ शासनाला कोंडीत न पकडता व वितंडवाद न घालता एखाद्या प्रश्नावर चर्चा व मतांची देवाण–घेवाण करून, त्या प्रश्नाच्या सर्व बाजूंचा अभ्यास करून, त्या प्रश्नाचे सुटसुटीत विश्लेषण करणे आवश्यक आहे. पण त्याच बरोबर त्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठीचे पर्याय सुचविणे सुद्धा सार्वजनिक जीवनात वावरणाऱ्या व्यक्तीचे कर्तव्य ठरते, असे गोखले मानतात.

याच भूमिकेतून गोखल्यांनी शारीरिक बळाचा वापर, बंड, उठाव, परकीय आक्रमणास मदत वा प्रोत्साहन, गुन्हेगारी वा हिंसाचाराचा अवलंब या घटनात्मकतेच्या नकारात्मक बाजूपेक्षा प्रार्थना, विनवण्या, आवाहने, मागण्या, वाटाघाटी, निर्भयपणे रचनात्मक टीका आणि याचबरोबर कोणतीही शांततामय पद्धती. या सारख्या घटनात्मकतेच्या सकारात्मक बाजूचाच वापर राजकीय चळवळीत स्वीकारला जावा, अशी भूमिका घेतलेली दिसून येते.

ना. गोखले यांच्या राजकीय विचारात ''स्वदेशी व बहिष्कार'' या दोन संकल्पना संदर्भातील त्यांची भूमिका लक्षात घेतल्याशिवाय त्यांच्या राजकीय विचारांचा परामर्श घेणे एकाकीपणाचे ठरते.

''स्वयंशासनाचे मर्यादित'' ध्येय साध्य करण्यास ना. गोखलेचे स्वदेशी संदर्भातील विचार ''साधन'' म्हणून प्रभावीपणे महत्वाचे ठरतात.

बनारस काँग्रेसच्या (१९०५) अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणात गोखल्यांनी खऱ्या स्वदेशीच्या दोन बाजू सांगितल्या आहेत. एक आहे शुद्ध देशभक्तीची आणि दुसरी आहे व्यावहारिक आर्थिक स्वरूपाची. मानवी मनाला हालवून सोडण्याचे सामर्थ्य स्वदेशीत आहे.– गोखले. स्वदेशीत देशभक्तीचा अंर्तभाव होतो. देशभक्ती ही अशी एक विलक्षण उत्कट व गाढ श्रद्धा आहे की, तिच्या उच्चाराने चित्त हेलावते, तिचा स्पर्श आत्म्याला नवेरूप धारण करायला लावतो.

राव–रंक, उच्च–नीच, शेतकरी–सावकार, हवेली–झोपडी, शहर–खेडे अशा सर्वांमध्ये देशभक्तीच्या मंत्राचा प्रसार करण्याची आवश्यकता आहे. देशसेवेशिवाय दुसरे काही सुचू नये इतका या मंत्राचा प्रभाव दिसला पाहिजे.

स्वदेशी वस्तूंचा उपयोग हा ''स्वदेशी'' चा दुसरा भाग अर्थशास्त्राचा आहे. त्यासाठी सामंजस्यपणा, सहकार हे गुण अंगी असले पाहिजे.

स्वदेशीमालाच्या उत्पादनासाठी भांडवल, साहस व कौशल्य हवेच. मात्र हिंदुस्थानात भांडवलाचा तुटवडा आहे. यातून मार्ग काढण्यासाठी हिंदूस्थानात सुधारलेल्या कापसाची लागवड आधी करून उपलब्ध कापसातून हातमागावर होणारे कापड यंत्रमागापेक्षाही उत्तम असले तरी ते पुरेशा प्रमाणात तयार होत नाही आणि याला प्रमुख कारण म्हणजे पुन्हा अपुरे भांडवल हेच होय. यातून मार्ग काढण्यासाठी गोखले सुचवितात की, भारतातील इतर क्षेत्रातील भांडवल काढून ते कापड व्यवसायात गुंतवावे व हातमाग व्यवसायात सुधारणा करून त्याची उत्पादन क्षमता वाढवावी. एवढेच नाही तर यापुढे जावून गोखले म्हणतात की, स्वदेशीला मदत करण्यासाठी जे पुढे येतील त्या सर्वांची (शासनाची) देखील मदत घेऊन स्वदेशीच्या वाटेतील अडथळे दूर करावेत.

मात्र स्वदेशी संदर्भात उपरोक्त विचार मांडताना गोखले म्हणतात, आधीच विभक्त असलेल्या हिंदूस्थानाच्या समाजात स्वदेशीच्या माध्यमातून निमित्त घेऊन हिंदुस्थानाच्या समाजाचे विभाजन टाळण्यासाठी कोणलाही स्वदेशीच्या चळवळींपासून तोडू नये.

टिळकांच्या स्वदेशातील हेतू मुख्यत: शासनाला प्रतिकार करणे हा आहे. उलट गोखल्यांना शासनाचीही मदत घेण्यास काहीच वावगे दिसत नाही. टिळकांना बहिष्कार ही स्वदेशीची दुसरी बाजू दिसते मात्र गोखले त्या दोहोंचा स्वतंत्रपणे विचार करून स्वदेशीचा स्वीकार करतात व बहिष्कार नाकारतात. कारण गोखलेंच्यामते बहिष्काराचा मार्ग केवळ अनिष्ठच नाही तर तो धोक्याचा आहे. गोखल्यांच्यामते बहिष्कार या शब्दाच्या मुळाशी इतरांना इजा पोचविण्याची खुनशी व द्वेशमूलक अशी इच्छा वसत असते आणि ते जर साध्य होत असेल तर तदर्थ स्वत:लाही इजा करवून घेण्यास काही लोक तयार असतात. त्यामुळे स्वदेशी बद्दलच अपसमज प्रसृत होऊन तिच्यावाटेत अनेक अडथळे निर्माण होतात, असे गोखल्यांना वाटते.

स्वदेशीचे कार्य विराट आहे. त्याच्या पूर्तीसाठी सगळीकडून सहकार्याची अपेक्षा आहे, असे असताना काहींना दुखविणारे बहिष्काराचे धोरण स्वदेशीला मारक ठरण्याचीच शक्यता मोठी आहे.

गोखले सार्वत्रिक राजकीय बहिष्काराला कसून विरोध करातात. शिक्षणाच्या क्षेत्रात नव्या खाजगी शाळा व महाविद्यालये उभी राहीपर्यंत राष्ट्रीय शिक्षणाच्या नावाखाली सरकारी शिक्षण संस्थांवर बहिष्कार घालणे गोखलेंच्यामते शुद्ध वेडेपणाचे ठरेल.

गोखले सरकारी नोकरीवर बहिष्कार घालण्याचे एकीकडून स्वागत करतात. कारण कधी तरी सरकारी नोकऱ्यांप्रीत्यर्थ होणारी धडपड थांबावी व स्वतंत्र क्षेत्रात तरूणांनी उमेदीने पदार्पण करून देशसेवेचे विविध मार्ग चोखाळावेत, अशी गोखल्यांची सुरूवातीपासूनच इच्छा होती.

विधिमंडळ व म्युनिसिपल बोर्डावरील मानसेवी जागांवर बहिष्कार घालणेही गोखल्यांना नामंजूर होते. कारण आज त्या जागांवर जे आहेत त्यांनी राजीनामे दिले तर दुसरे लोक त्या जागांसाठी धावत येतील आणि राजीनामा देणाऱ्यांना आपण लोकसेवेची संधी निष्कारण दवडली असा पश्चाताप करण्याची पाळी येईल. त्यापेक्षा उपलब्ध अधिकाराचा पुरेपूर उपयोग करून प्रशासनावर सतत नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करणेच त्यांना अधिक श्रेयस्कर ठरणार आहे. सार्वजनिक जीवनाचे पाय खिळखिळे करणाऱ्या अशा चळवळी लोकांच्या या प्रतिनिधींनी हाणून पाडायला पाहिजेत, असे गोखले म्हणतात.

**धर्मनिरपेक्ष आधुनिक राज्याची संकल्पना**

गोखलेंच्यामते भारताला जर लोकशाही शासन प्रकाराने वाटचाल करावयाची असेल तर 'प्रथम लोकशाही समाजाची निर्मिती येथे झाली पाहिजे, इथले राजकारण धर्मनिरपेक्ष झाले पाहिजे आणि येथील सार्वजनिक जीवनाचे अध्यात्मिकरण झाले पाहिजे. अशा विविध प्रयत्नाखेरीज भारतात स्वयंशासन निर्माण होऊच शकत नाही, असे गोखलेंचे ठाम मत होते.

केवळ मागणी करून कुणालाच कधी स्वातंत्र्य मिळाले नाही. सर्वत्र ते मोठ्या लढ्यातूनच पदरात पडले आहे. आणि हा स्वातंत्र्य लढा नेहमीच सर्जनशील व रचनात्मक असावा लागतो. या लढ्यात शिक्षणाच्या माध्यमातून लोकांच्या मनोवृत्तीत बदल करून आणणे आवश्यक आहे.--- गोखले.

आधुनिक राज्याच्या उभारणीसंबंधी गोखल्यांनी खोल विचार करून 'आपण प्रथम हिन्दी असून हिन्दू, मुसलमान, पार्शी, ख्रिस्ती वगैरे भेद नंतर' या भूमिकेतून हिन्दसेवक समाजाचे कार्य चालावे अशी गोखलेंची अपेक्षा होती.

भारताच्या राष्ट्र उभारणी संदर्भात गोखल्यांच्या हिन्दू-मुस्लिम समस्येसंबंधीचा दृष्टिकोन बराचसा धर्मनिरपेक्ष होता. कायदे कौन्सिलात केलेल्या एका भाषणात या संदर्भात भूमिका मांडतांना गोखले म्हणतात, मुसलमानांच्या राजकीय महत्त्वकांक्षेची योग्य ती दखल घेतली जाऊन त्यांनी विशेष मतदारसंघाची मागणी करण्यात काहीच गैर नाही. तसेच या संदर्भात गोखले यांनी या देशातील त्यांची प्रचंड संख्या, त्यांच्या प्रदीर्घ परंपरा, त्यांची प्राचीन संस्कृती या देशाच्या प्रगतीत त्यांना असलेला रस, या सगळ्या गोष्टी पाहता त्यांना पुरेशा प्रतिनिधीत्वावाचून ठेवणे इष्ट  नाही. ते या देशात अल्पसंख्यांक आहेत आणि म्हणूनच त्यांचे महत्त्व लक्षात घेऊन त्यांना प्रतिनिधीत्व दिले जाण्यात गोखल्यांना काही गैर दिसत नाही.

हिन्दु मुस्लिमात सलोखा, सहकार्य व सहायोग वाढेल यावर गोखल्यांचा विश्वास होता. या विश्वासातूनच ते म्हणतात, कायदे-कौन्सिलात हिन्दू किती व मुसलमान किती आहेत; यापेक्षा आमच्यापैकी कितीजण काम करतात व कोणत्या वृत्तीने करतात हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. केवळ संख्येला आज इथे किंमत नाही. खरे पाहता आम्ही जास्त असोत वा कमी असोत आज फक्त शासनावर किती नैतिक प्रभाव आम्ही पाडू शकतो एवढेच आम्ही पाहायचे. --- ना. गोखले.

गोखल्यांच्या वृत्तीतील सहिष्णुता, मुस्लिम लीगच्या स्थापनेप्रसंगी (१९०६) त्यांनी घेतलेल्या भूमिकेवरूनही स्पष्ट होते. लीगची स्थापना ही गोष्ट त्यांना एक प्रामाणिकपणे अभिनंदन करण्यासारखी बाब वाटली होती. कारण आजपर्यंत केवळ गोहत्या व वाद्यबंदी अशा धार्मिक प्रश्नांवरूनच हिन्दू-मुस्लिमात वाद झाले होते. सार्वजनिक सेवेत पुरेशा प्रमाणावर मुलसमानांना प्रवेश वा कौन्सिलमध्ये पुरेशे प्रतिनिधीत्व मिळत नसल्याबद्दलच्या तक्रारीही अधून-मधून कानी येत असत. परंतु स्वतःच्या खास कार्यक्रमाच्या आधारे एक जमात म्हणून मुसलमानांना देशप्रशासनात विशेष सवलती मिळवून देण्यासाठी नेत्यांच्या संघटनांची कल्पनाही अलीकडचीच मानावी लागेल. वर्षानुवर्षाची राजकीय अनास्था झुगारून आपले मुस्लिम बांधव संघटीत  होत आहेत. ही बाब  म्हणूनच गोखल्यांना अभिनंदनीय वाटते. परंतु सार्वजनिक जीवनातील त्रुटी अशा संघटनामुळे भरून निघतील असे गोखल्यांना वाटत नाही.

गोखल्यांच्या मते संख्या, धनसंपदा, शिक्षण, सार्वजनिक कृती या सर्वच दृष्टीने हिन्दू हे फायद्याच्या बाजूने आहेत. पण त्यांच्यात सामाजिक ऐक्य नाही. ते वृत्तीने सौम्य आणि निष्क्रीय असून जातीपातीमधील वैमनस्यामुळे फुटीर झाले आहेत. या उलट मुलसमानांमध्ये विभाजने कमी आहेत. त्यांच्यात संघटनाची भावना अधिक प्रबळ आहे. त्यांना अगदी सहजासहजी क्रियाशील बनतवा येते. या दोन जमातींना देशातील मोठ्या भागात वैमनस्याचा वारसा लाभला असून एरव्ही जरी ते वैमनस्य स्थूल स्वरूपात राहिले तरी साध्या कारणावरूनही ते भडका घेत असते. ही वस्तुस्थिती अतिदुर्दैवी आहे, असे ना. गोखल्यांना वाटते.

**राजकारणाचे अध्यात्मिकरण**

''सार्वजनिक जीवनाचे अध्यात्मिकरण व्हावे'' (Public life must be spiritualized) गोखल्यांच्या या विधानाला खास संदर्भ आहे. आपल्या सार्वजनिक वा राजकीय जीवनाचे अध्यात्मिकरण करण्यासंबंधी गोखल्यांनी मांडलेले प्रमेय हे प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानावर आधारलेले आहे. धर्मभक्त ज्या तळमळीने होमहवन, उपासना, व्रतवैकल्ये, यमनियम, नित्यनेम इत्यादी आचरतात त्याच शक्तीने व तळमळीने लोकसेवेची कामेही केली जावीत असा त्या प्रमेयाचा अर्थ आहे.

अध्यात्माला जसा द्वैतभाव, दुजेपणा, आपपरभाव नको असतो तसा द्वैतभाव सामाजिक संबंधासाठी नसावा असे गोखल्यांना सुचवायचे होते.

आपली राजकीय स्थिती आपल्या अधोगतीची द्योतक आहे. आपली राजकीय स्थिती सुधारली की, अध:पतनातून आपले डोकेवर निघेल ही समजूत लोकप्रिय आहे. पण ती सर्वांगीण विचारांच्या अभावी रोढावली आहे. ती अर्थवट खरी आहे. – गोखले.

राजकीय स्थिती सुधारण्याखेरीज आपला उद्धार होणार नाही, पण ज्या उपयांनी राजकीय स्थिती सुधारेल त्या उपायांवर आपली प्रगती अवलंबून राहील. उपाय जर शुद्ध नसतील तर प्रगतीच्या उलट स्थिती अनुभवास येण्याचा संभव आहे. अशा ठाम विश्वासातून गोखल्यांनी सार्वजनिक कार्यास हात घातला होता.

देशाचे मुक्ति–आंदोलन धार्मिक–अध्यात्मिक म्हणजेच विशुद्ध व नि:स्वार्थी राहिल्याखेरीज ''मोक्ष'' मिळणे शक्य नाही. हे तत्त्व हिन्दसेवक समाजाच्या रूपाने गोखल्यांनी राष्ट्रापुढे ठेवले होते. ''राजकीय संन्यासी'' निर्माण करणे हा या समाजाचा हेतू होता.

'आमच्या काळात राजकीय संन्यासीच आपले ध्येय सफल करून आपला संन्यास हे देशाचे भूषण बनवतील. बाकीचे संन्याशी बहुधा आपल्या भगव्या वस्त्राची प्रतिष्ठा घालवणारे ठरतील. म्हणजेच ज्याला खरोखरीच्या धर्मनिष्ठेने आयुष्य घालवावयाचे असेल त्याने ''लोकसेवा'' आपले अमरण इतिकर्तव्य मानून राहिले पाहिजे, सांप्रत आपले सर्व जीवन राजकारणाच्या यंत्रात असल्यामुळे राजकारणात पडण्याशिवाय लोकसेवा अशक्य आहे.'

सध्या राजकारणाची उपेक्षा करून चालणार नाही हा गोखल्यांचा संदेश होता. राजकारणाच्या अध्यात्मिकरणाचा (Spiritualization of politics) त्यांना अभिप्रेत असलेला हा अर्थ होता. देशोन्नतीचा उद्योग हाच त्यांचा परमार्थ अथवा मोक्षमार्ग होता.

**मध्यम वर्गाची भूमिका**

ना. गोखल्यांच्या मते जो पर्यंत भारतातील मध्यम वर्ग जनहिताच्या योजना हाती घेऊन समाज परिवर्तन करण्यासाठी कटीबद्ध होत नाही, तोपर्यंत खऱ्या अर्थाने भारतात सामाजिक जीवन निर्माण होऊन राष्ट्र उद्धार होणार नाही.

या भूमिकेतून गोखलेंच्या मते सुशिक्षितांची मने केवळ सरकारी नोकऱ्यांवर खिळून न राहता सार्वजनिक कार्यांची त्यानी स्वत:ला गोडी लावून घेणे आवश्यक आहे. तरूणांनी जनसेवेची निरनिराळी क्षेत्रे शोधून स्वतंत्र प्रयत्नांच्या बळावर तरूणांनी उभे राहिले पाहिजे. विद्यापीठातून बाहेर पडणाऱ्या तरूणांनी केवळ आत्मोन्नती हे ध्येय न ठेवता स्वार्थत्यागाच्या भावनेने देशकार्याला वाहून घेतले पाहिजे.

सारांशाने ना. गोखल्यांच्या उदारमतवादी राजकीय विचार प्रवाहाचे अचूक शब्दांकन सी. वाय. चिंतामणी यांनी ना. गोखल्यांचा जो गौरव केला त्या निवडक पंक्तीच्या सहाय्याने शोधनिबंधाला पूर्णविराम देतो.

''गोखल्यांच्या विचारांची व्याप्ती एवढी प्रचंड होती की कोणताही सार्वजनिक प्रश्न घ्या. गोखल्यांच्या व्याख्यानामधून त्याच्यावर थोडातरी प्रकाश पडणार नाही असे होणेच नाही. तपशीलावरील प्रभुत्व, युक्तिवादामागून

युक्तिवाद करीत राहण्याची क्षमता, आकडेवारीवरील कमालीची पकड, सुसंस्कृत उपहास व नैतिक तळमळ, प्रश्नाकडे ऐतिहासिक दृष्टिकोनातून पाहणारी दृष्टी आणि या सर्वांपेक्षा कोणत्याही प्रश्नाला त्याच्या सगळ्या अंगांनी बारकाईने न्याहाळून त्याच्यावरील व्यवहार्य उपाय सुचविण्याची हातोटी. या सगळ्या गुणांमुळे गोखले हे आपल्या काळातील सर्वोत्तम संसदपटू ठरले आणि आजतागायत हे त्यांचे ते स्थान अढळच आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही.''

**संदर्भ ग्रंथ**

१) फाटक न. र., आदर्श भारत सेवक, मौज प्रकाशन, मुंबई, १९६७.
२) अय्यर एस. पी., पोलिटिकल फिलॉसफी ऑफ गोपाल कृष्ण गोखले.
३) स्पीचेस ॲन्ड रायटिंगज ऑफ गोपाल कृष्ण गोखले.
४) दि सिलेक्ट गोखले (संकलन व संपादन : र. पु. पटवर्धन) : महाराष्ट्र इन्फॉर्मेशन सेंटर, नवी दिल्ली, १९६८.
५) पंडित नलिनी, महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास, मॉर्डन बुक डेपो, पुणे, १९७२.
६) माथूर डी. बी., गोखले – ए पोलिटिकल बॉयोग्राफी, मानकतालास, मुंबई, १९६६.
७) गांधी मो. क., गोखले माझे राजकीय गुरू, मराठी भाषांतरकार – वि. अ. पटवर्धन, चेतक पुस्तक, मुंबई, १९६९.